लव्ह जिहाद वास्तव आणि अपप्रचार

मुझ्झफरनगरमधील जातीय दंगलीनंतर अजूनही देश सावरलेला नाही आहे. या दंगली हा अनेक वर्षाच्या अपप्रचाराचा परिपाक आहे. वास्तविकरित्या उत्तर प्रदेशाच्या पश्चिम भागात जाट व मुस्लीम समाजाचे घरोब्याचे संबंध आहेत आणि आर्थिक स्तर ही जवळपास एकच आहे. यापूर्वीच्या दंगलींची कारणे गोहत्या, बाबरी मशिद प्रकरण, "आमच्या स्त्रियांवर झालेले अत्याचार", यासारख्या कारणांमुळे होत होत्या. आताच्या दंगलीत मात्र "आमच्या मुलींची मुसलमान युवकांकडून होणारी छेडछाड आणि त्यामुळे आमच्या तथाकथित इज्जतिला होणारा धोका" याबद्दल होणारा अपप्रचार हा काळजीचा नवीन विषय होऊन बसला. यासाठी जातीयवादी प्रचारयंत्रणेकडून मोबाईलवरून विविध व्हिडिओ अपलोड करणे, बहु बेटी बचाओ असा विषारी प्रचार करणे असा विविधांगी प्रचार करण्यात आला.

मागच्या २ वर्षापासून या भागात  घडणाऱ्या स्त्रीयांच्या छेडछाडीला जातीय रंग देण्यात येत होता. पद्धतशीरपणे लव्ह जिहादच्या अफवा पसरवल्या जात होत्या. (संदर्भ: 'अनहद' संस्थेचा मुझ्झफरनगर दंगलीवरचा अहवाल). मुस्लीम तरुण हिंदू तरुणीना आपल्या जाळ्यात ओढतात व त्यानंतर धर्मांतरासाठी सक्ती करतात असा अपप्रचार आतिशय वेगात सुरु होता.

या लव्ह जिहाद शब्दाचा इतिहास खूप रोचक आहे. 'जिहाद' शब्द ज्याचा कुराणातील अर्थ 'आपल्या ध्येयासाठी आपल्या सर्वस्वानिशी झुंज देणे' असा आहे. पण ११ सप्टेंबर २००१ च्या वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या हल्ल्यानंतर गैर मुस्लिमांची कत्तल/हत्या असा पूर्ण चुकीचा अर्थ प्रचलीत झाला. लव्ह आणि जिहाद हे दोन्ही शब्द ज्या पाताळयंत्री बुद्धीने एकत्र आणले आहेत, त्यावर टीका करण्यास शब्द पुरे पडणार नाहीत.

आता जातीयवादी प्रचारयंत्रणा सांगत आहेत की काही मुस्लीम संघटना मुस्लीम युवकांना, गैर मुस्लीम युवतीना आपल्या जाळ्यात ओढण्यासाठी पैसे देतात. त्यांना मोबाईल फोन, गाडी दिली जाते. त्याचा उपयोग करून ते अन्य धर्मीय तरुणींना फशी पाडतात, त्यांच्याशी लग्न करतात व मुस्लीम लोकसंख्या वाढते.

जर तुम्ही इंटरनेटवर गुगल या सर्च इंजिनवर why hindu girls are ( का हिंदू युवती) एवढे टाईप केले तर या वाक्याचा उत्तरार्ध attracted to muslim boys  (मुस्लीम मुलांकडे आकर्षित होतात) असा पूर्ण (autocomplete)होतो.

महाराष्ट्रामध्ये हिंदू रक्षक समिती या धार्मिक संघटनेने आवाहन आवाहन केले आहे की जर हिंदू धर्माचे रक्षण करायचे असेल तर हिंदू मुस्लीम जोडप्यांची (ज्यांनी आंतरधर्मीय विवाह केला असेल) त्यांची लग्ने मोडा. अर्थात अशा लग्नांचे प्रमाण समाजात अगदीच नगण्य आहे, परंतु हे स्वयंघोषित धर्मरक्षक मुस्लीम मुलांवरती तूटून पडतात. मराठीमध्ये लव्ह जीहादवरती एक पुस्तिका आली आहे त्यामध्ये एक मुस्लीम मुलगा एका हिंदू मुलीला मोटर सायकलवरती मागे बसवून हिंडवताना दाखवला आहे. आता तर केरळमधील एका ख्रिश्चन संघटनेने विश्व हिंदू परिषदेशी हा अस्तित्वात नसलेला प्रकार थांबवण्यासाठी हातमिळवणी केली आहे.

या शब्दप्रयोगाची सुरुवात भारतात केरळ व मेंगलोरपासून श्रीरामसेना या संघटनेने केली. या श्रीरामसेना संघटनेचा संस्थापक प्रमोद मुतालिक हा संघाच्या शिबिरामध्ये प्रशिक्षण घेऊन आला आहे. ज्या आंतरधर्मीय जोडप्यांमध्ये हिंदू मुलगी आणि मुस्लीम मुलगा असेल त्यावर हल्ले चालू केले होते. अशा लग्नांकडे संशयाने पाहू जाऊ लागले. आणि

पालकांचा विरोध असेल तर श्रीरामसेना अशी प्रकरणे कोर्टात घेऊन जाण्यासाठी श्रीरामसेना मदत करू लागली. अशाच एका कथित घटनेमध्ये मुलीचे जबरदस्तीने धर्मांतर केले व मुस्लिम मुलाशी लग्न लावले या आरोपाखाली खटला दाखल झाला. कर्नाटक हायकोर्टाच्या सिलाईराज आणि अझगर या दोन्ही न्यायाधीशांनी निर्णय दिला की लव्ह जिहाद हा राष्ट्रीय एकात्मतेला धोकादायक व देशाच्या सुरक्षेसाठी चिंता वाटण्यासारखी गोष्ट आहे. शिवाय यामध्ये महिलांवर अन्याय होतो आहे. म्हणून त्यानी कर्नाटकच्या डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस आणि इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस याना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचा आदेश दिला व त्या मुलीला पालकांकडे परत पाठवण्यात आले. वास्तवात ही एक हिंदू मुस्लीम लग्नाची साधी गोष्ट होती. त्या मुलीने सामाजिक दबावाला बळी पडण्यास ठाम नकार दिला. पोलीस चौकशीतून हेच सिद्ध झाले की लव्ह जिहाद ही एक कपोलकल्पित कहाणी असून त्याला काहीही पुरावा नाही. केरळमध्येही  दोन हिंदू मुलिंनी मुस्लीम मुलांशी लग्न करण्याचे ठरवले आणि ईस्लाम कबुल केला. त्यावर २ पालकांनी केरळमधील उच्च न्यायालयामध्ये लव्ह जिहादच्या आरोपाखाली खटला दाखल केला. केरळ हायकोर्टानेही पोलीसाना प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले. पोलीस चौकशीत हेच सिद्ध झाले की लव्ह जिहाद हे वास्तवात अस्तित्वातच नाही परंतु समाजामध्ये फुट पाडण्यासाठी तयार केली गेलेली सांगीवांगीची गोष्ट आहे. परंतु, दुर्दैवाने समाजाची मानसिकता या प्रकारे तयार होत आहे.

श्रीरामसेनेने असा अपप्रचार सुरु केला आहे की जवळपास ४००० मुलीनां फूस लावण्यात आली आणि बळजबरीने धर्मांतर करण्यात आले. यासाठी वेगवेगळी माध्यमे वापरण्यात आली आणि पालकांच्या मनांत एक भयगंड रुजवण्यात आला. ज्या मुलीनी राजीखुशीने आपापले जीवनसाथी निवडले होते व स्वखुशीने धर्मांतराचा निर्णय घेतला होता, त्याना पालकांकडे सक्तीने सोपवल्यानंतर मते बदलू लागल्या व आपल्यावर ईस्लामसाठी सक्ती झाली. आपल्याला जिहादी सीडी दाखवून मत बदलण्यास भाग पाडले असा प्रचार सुरु केला.

हा अनुभव गुजराथ दंगलीच्या वेळी ही आला होता. त्यावेळी मुस्लीम तरुण आदिवासी मुलीनां फूस लावतात अशा अफवा उठवून मुस्लीम सामाजाविरोधी वातावरण तयार केले गेले. बाबू बजरंगी हा विहीपचा कार्यकर्ता ज्याला गुजराथ दंगलीतील सहभागाबद्दल जन्मठेप झाली होती त्यानी एक गुंडांची टोळी तयार करून ज्या लोकांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह केले होते त्यांच्यावर हल्ले केले होते आणि त्यांना वेगळे होण्यास भाग पाडले होते. हे सर्व धर्म संरक्षण च्या नावाखाली केले गेले.

याउलट आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह ही नैसर्गिक गोष्ट आहे.  परंतु राजकारणामध्ये आणि समाजकारणामध्ये धर्मांधतेचे प्रमाण जसेजसे वाढते आहे तसे तसे या लग्नानां विरोध वाढतो आहे आणि ही खरोखर भयावह गोष्ट आहे.कोलाकोत्यामध्ये रिझवान उर रेहमान आणि प्रियांका तोडी यांचे उदाहरण समोर आहे. प्रियांका ही कोलाकोत्यातील धनाढ्य व प्रतिष्ठीत घराण्यातील मुलगी रीझवानच्या प्रेमात पडली व दोघांनी लग्न केले. तिला घरातील लोकांनी व नातेवाईकानी प्रचंड मानसिक त्रास देऊन माघार घ्यायला लावली तर रीझवानने आत्महत्या केली. त्याच्या आत्महत्येमागची कारणे अजून ही स्पष्ट झालेली नाही आहेत. या आणि यासारख्या अनेक घटनांमध्ये पोलीस आणि राज्यसरकार हे कायदा आणि राज्य घटनेविरोधी वागत असल्याचे लक्षात आले आहे.

आंतरजातीय आणि आंतरधर्मीय लग्नाविरोधी चालणाऱ्या या प्रचारमोहिमा खरोखरच राष्ट्रीय एकात्मतेला आतिशय घातक गोष्टी आहेत. याशिवाय मुलींनी सतत घरच्यांच्या धाकात राहावे हे स्त्री स्वातंत्र्याच्या अत्यंत विरोधी आहे.

जातीयवादी शक्ती  अल्पसंख्याकविरोधी प्रचारात या मुद्याचा वापर करून राजकारण साधत असतात. त्यांच्या दृष्टीने या सर्वांचा दुप्पट फायदा असतो. एक म्हणजे आपल्या पारंपारिक कुटुंबव्यवस्थेत व पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांचे स्थान सतत दुय्यम ठेवले आहे. या मुद्यामुळे समाजाच्या भावना उसळतात व स्त्रियांना दडपायला मदत होते. तर दुसऱ्या बाजूला अल्पसंख्याकांना लक्ष्य करून दुहीचे राजकारण साधण्यात मदत होते.

आता हा लव्ह जिहादचा मुद्दा फक्त हिंदू मुलीना घरच्यांच्या धाकात ठेवण्याचा व त्यांना त्यांचा जोडीदार निवडण्याचा हक्क नाकारण्याचा राहिला नाही तर हाच लव्ह जिहादचा मुद्दा जातीय दंगली पेटवण्यासाठी वापरण्यात येत आहे. याचा अनुभव मुझ्झफरनगरला आला. बहुतेक जातीय दंगलींची सुरुवात ही हळूहळू पसरत जाणाऱ्या अफवांनी व अपप्रचाराने होते. या लव्ह जीहादमुळे मुस्लिम युवकांना सतत खलनायकाच्या रूपात दाखवले जाते. तर दुसऱ्या बाजूला स्त्री स्वातंत्र्यावर घाला घातला जातो. संघ परिवार, अफगाणीस्तानमधील तालिबान, मुस्लीम धर्मांधवादी शक्ती या सर्वांची स्त्रियांच्याबाबत स्त्री स्वातंत्र्याला विरोध ही भूमिका समान आहे.

गुजराथ दंगलीतील बाबू बजरंगी, कर्नाटकातील श्रीराम सेना, वा मुझ्झफरनगरमधील जातीयवादी या सर्वांचे स्त्रिया या पुरुषांच्या गुलाम आहेत व त्यांना तसे जबरदस्तीने वागवले पाहिजे यावर एकमत असते. हा मुद्दा फक्त लव्ह जिहादचा नसून या निमित्ताने जातीयवादी शक्ती अपप्रचार करून विष पसरवण्याचे काम करतात याचा आहे. आणि आपण सर्वानी संघटीतपणे या सर्व प्रकाराला विरोध केला पाहिजे.